# सन २०१४ मधील महाराष्ट्र राज्यातील गुन्हेगारीची भारतातील गुन्हेगारीशी तुलना

**(एन.सी.आर.बी., नवी दिल्ली यांनी प्रकाशीत केलेल्या क्राईम इन इंडिया - २०१४ या अहवालावर आधारीत)**

**१. भा.दं.वि. खालील दाखल गुन्हयांचा कल -**

- देशामध्ये भा.दं.वि. खालील एकूण २८,५१,५६३ गुन्हे दाखल असून, त्यापैकी महाराष्ट्र राज्यात २,४९,८३४ (८.८%) गुन्हे व मध्यप्रदेशात २,७२,४२३, (९.६%) एवढे गुन्हे दाखल आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार देशामध्ये भा.द.वि. खालील दाखल गुन्हयांचे प्रमाण (क्राईम रेट)* (२२९.२) एवढे असून, महाराष्ट्र राज्याचे गुन्हे प्रमाण (क्राईम रेट) (२१२.३) एवढे आहे, तर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र १७ व्या क्रमांकावर आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये भा.दं.वि. खालील एकूण ६,१६,६३९ गुन्हे दाखल असून, दाखल गुन्हयांमध्ये दिल्ली शहर १,३९,७०७ (२२.७%), मुंबई शहर ४०३६१ (६.६%), बेंगलुरु ३१८९२ (५.२%), कोलकता २६१६१ (४.२%) व जयपुर २६०७० (४.२%) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा ४२ वा क्रमांक आहे.

**खून -**

- देशात खून या गुन्हेशीर्षकाखाली, दाखल गुन्हयांमध्ये उत्तर प्रदेश (५१५०), बिहार (३४०२), नंतर महाराष्ट्र (२६७०), मध्यप्रदेश (२२७४), पश्चिम बंगाल (२२१७) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १९ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरात दाखल गुन्हयांमध्ये दिल्ली शहर (४७२), बेंगलुरू (२४१), पाटणा (२०५), मुंबई (१८३) चेन्नई (१६१) व असा क्रम आहे. खुनाच्या दाखल गुन्हयांमध्ये, गुन्हे प्रमाणात मुंबई शहराचा २६ वा क्रमांक आहे.

**खूनाचा प्रयत्न -**

- देशात खुनाचा प्रयत्न या शीर्षकाखाली दाखल गुन्हयामध्ये पश्चिम बंगाल (७२४८),उत्तर प्रदेश (५२२३), बिहार (४३७९), तामिळनाडू (२९२२) व महाराष्ट्र (२६१३) असा क्रम आहे. याच शीर्षकाखाली गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १६ वा क्रमांक लागतो.
- देशातील मोठया शहरात दाखल गुन्हयांमध्ये दिल्ली शहर (६७५), बेंगलुरु (४८९), चेन्नई (२२५), इंदौर (१८३) मुंबई शहर (१८१) व असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा ३१ वा क्रमांक आहे.

**अपहरण व पळवून नेणे -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली मध्यप्रदेश (७८३३), दिल्ली शहर (७१७३), बिहार (६५७०), पश्चिम बंगाल (६११०) राजस्थान (५६७१), इत्यादी काही ५ राज्यानंतर महाराष्ट्रात (३७९३) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १९ वा क्रमांक लागतो.
- देशातील मोठया शहरामध्ये दिल्ली शहर (६०१६), बेंगलुरु (७०८), जयपूर (६५३), पाटणा (५९९), इंदौर (४३९), व मुंबई शहरामध्ये (५४१) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्य मुंबई शहराचा ३६ वा क्रमांक आहे.

**दरोडा -**

- देशात दरोडयाच्या दाखल गुन्हयांमध्ये महाराष्ट्र (८८५), बिहार (५३८), ओडिशा (४८४), गुजरात (२९६), उत्तर प्रदेश (२९४) व असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा ४ वा क्रमांक आहे.
- मोठया शहरामध्ये पुणे (९२), दिल्ली (६५), बेंगलुरू (५१), मुंबई शहरात (३४) पाटणा (२८) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा १० वा क्रमांक आहे.

*** गुन्हे प्रमाण (क्राइम रेट) - दर एक लाख (१,००,०००) लोकसंख्येस दाखल गुन्हयांची संख्या.**

**जबरी चोरी**

- देशात जबरी चोरीचे महाराष्ट्र (९४६६), दिल्ली (६४६४), उत्तर प्रदेश (३९२०), कर्नाटक (२५१६), मध्यप्रदेश (१९६९) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये दिल्ली (५८४७), मुंबई (२०९४), बेंगलुरु (१०६७), पुणे (८७३), नागपुर (५०५) गुन्हे दाखल आहेत. मुंबई शहराचा गुन्हे प्रमाणामध्ये अनुक्रमे २ रा क्रमांक आहे.

**चोरी -**

- देशामध्ये चोरीचे दाखल गुन्हयांमध्ये दिल्ली (७८७५३), महाराष्ट्र (५६२८३), उत्तर प्रदेश (४८३८०), मध्यप्रदेश (२९२४४), व राजस्थान (२९०९५) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा २ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये चोरीच्या दाखल गुन्हयांमध्ये दिल्ली शहर (७१९३७), बेंगलुरु (११४५५) नंतर मुंबई शहर (१०१०१), असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा ३ वा क्रमांक आहे.

**घरफोडी -**

- देशात घरफोडीचे महाराष्ट्र (१७१७१), मध्यप्रदेश (१२११०), दिल्ली (१०३०९), उत्तरप्रदेश (६९२१) व हरियाणा (६७१७) व असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये दिल्ली शहर (८९३९), मुंबई (३०५५), बेंगलुरु (१५४२), इंदौर (१३८८) व पुणे (१३६२) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा २ वा क्रमांक आहे.

**दंगा -**

- देशामध्ये दंगा या गुन्हे शीर्षकाखाली बिहार (१३५६६), महाराष्ट्र (७७६०), कर्नाटक (६५२०), उत्तरप्रदेश ( ६४३८) केरळ ( ५८२०) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा २ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये पटणा ( ४७० ), मुंबई (४०९), बेंगलुरु (३८८) , कोलकत्ता ( ३१५), कोलम (३०१) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर अनुक्रमे २ -या क्रमांकावर आहेत.

**अन्यायाने विश्वासघात -**

- अन्यायाने विश्वासघात या गुन्हे शीर्षकाखाली देशामध्ये उत्तर प्रदेश (४०७४) नंतर महाराष्ट्र (१९५८), आसाम ( १९५२), पश्चिम बंगाल (१९२१) ,बिहार (१२१९ ) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा २वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली मुंबई शहर (६७२), दिल्ली शहर (५९३), लखनौ (४५९), कोलकत्ता (३३८) व जयपूर (३२०) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहराचा १ वा क्रमांक आहे.

**ठकबाजी -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली राजस्थान (२११९१), उत्तर प्रदेश (१०६३६), महाराष्ट्रात (९९५९) , तेलंगणा (८५१९), कर्नाटक (६९३५) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा ३ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली जयपूर (४६३४), दिल्ली शहर (४११९), बेंगलुरु (३०४५), मुंबई शहरात (२५९४), हैद्राबाद (२५५७) व असे गुन्हे दाखल आहेत. मुंबई शहराचा गुन्हे प्रमाणामध्ये ४ वा क्रमांक आहे.

**दुखापत -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली पश्चिम बंगाल (१७८७७), बिहार (१७३५१), मध्यप्रदेश (१२११३), उत्तरप्रदेश (१०८६७ ), महाराष्ट्र (८१२६) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा ५ वा क्रमांक आहे.
- देशातील मोठया शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली पटणा ( २५१५), मुंबई शहर (२००६), कोलकत्ता (९०५), दिल्ली शहर ( ६०६ ), पुणे ( ४७० ) असे गुन्हे दाखल आहेत. मुंबई शहराचा गुन्हे प्रमाणामध्ये २ वा क्रमांक आहे.

❖ **भारतीय दंड विधान संहिते अंतर्गत उपरोक्त शीर्षकाखालील दाखल गुन्हयांची आकडेवारी परिशिष्ठ - १ मध्ये दर्शविलेली आहे.**

## २. स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे -

- देशामध्ये स्त्रियांवरील अत्याचाराचे एकूण ३३७९२२ गुन्हे दाखल असून, राज्यनिहाय दाखल गुन्हे व त्याचा वाटा, उत्तर प्रदेश ३८४६७ (११.४%), पश्चिम बंगाल ३८२९९ (११.३%), राजस्थान ३११५१ (९.२%),मध्यप्रदेश २८६७८ (८.५%) महाराष्ट्र २६६९३ (७.९%) व असा आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा १८ वा क्रमांक आहे.

**अ) बलात्कार -**

- देशात बलात्काराचे मध्यप्रदेश ५०७६ (१३.८%), राजस्थान ३७५९ (१०.२%), उत्तर प्रदेशमध्ये ३४६७ (९.४%), महाराष्ट्र ३४३८ (९.४%), दिल्ली २०९६ (५.७%) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा २० वा क्रमांक आहे.

**ब) अपहरण व पळवून नेणे -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली उत्तर प्रदेशमध्ये १०६२६ (१८.५%), मध्यप्रदेश ५६८६ (९.९%), पश्चिम बंगाल ४९७६ (८.७%), बिहार ४७३५ (८.३%), राजस्थान ४४२१ (७.७%) इत्यादी काही ७ राज्यानंतर महाराष्ट्र राज्यामध्ये २४५७ (४.३%) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा २३ वा क्रमांक आहे.

**क) हुंडाबळी -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली उत्तर प्रदेशमध्ये २४६९ (२९.२%), बिहार १७७३ (१६.२%) इत्यादी काही ५ राज्यानंतर महाराष्ट्र राज्यामध्ये २७९ (३.३%) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १५ वा क्रमांक आहे.

**ड) विनयभंग -**

- देशात विनयभंगाचे दाखल गुन्हे व त्याचा राज्यनिहाय वाटा महाराष्ट्र १०००१ (१२.२%), मध्यप्रदेश ९६०९ (११.७%), उत्तर प्रदेश ८६०५ (१०.५%), राजस्थान ५९९९ (७.३%), पश्चिम बंगाल ५६७० (६.९%), असा आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा १२ वा क्रमांक आहे.

**इ) लैंगिक छळ -**

- देशात लैंगिक छळ या गुन्हे शीर्षकाखाली आंध्रप्रदेश २६४९ (२७.२%) व महाराष्ट्र राज्यात १५७५(१६.२%) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा ९ वा क्रमांक आहे.

**फ) पती किंवा पतीच्या नातेवाईकांकडून छळ**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, पश्चिम बंगाल २३२७८ (१८.९%), राजस्थान १५९०५ (१२.९%), उत्तर प्रदेश १०४७१ (८.५%), आसाम ९६२६ (७.८%) व महाराष्ट्र ७६९६ (६.३%) असा आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा १४ वा क्रमांक आहे.

**ग) अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा -**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, तामिळनाडू ४७१ (२२.८%), आंध्रप्रदेश ३८८ (१८.७%), आंध्रप्रदेश २०४ (९.९%), महाराष्ट्र २०२ (९.८%) असा आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा ८वा क्रमांक आहे.

❖ **स्त्रियांवरील अत्याचाराबाबतची उपरोक्त शीर्षकाखालील दाखल गुन्हयांची आकडेवारी परिशिष्ठ - २ मध्ये दर्शविली आहे.**

## ३. <u>अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराचे गुन्हे -</u>

- देशात अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराबाबतच्या एकूण दाखल ४७०६४ गुन्हयांपैकी, दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, उत्तर प्रदेश ८०७५ (१७.२%), राजस्थान ८०२८(१७.१%), बिहार ७८९३ (१६.८%), मध्यप्रदेश ४१५१ (८.८%), आंध्रप्रदेश ४११४ (८.७%) व महाराष्ट्र १७६८ (३.८%) असा आहे.

- या शीर्षकाखाली महाराष्ट्र राज्यात गुन्हयाचे प्रमाण (२३.४) एवढे असून, राज्याचा १६ वा क्रमांक आहे.

  ❖ **अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराचे गुन्हयांची आकडेवारी परिशिष्ठ - ३ मध्ये दर्शविली आहे मध्ये दर्शविली आहे.**

## ४. <u>बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे -</u>

- देशात बालकांवरील अत्याचाराबाबतच्या एकूण दाखल ८९४२३ गुन्हयांपैकी, दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, मध्यप्रदेश १५०८५ (१६.९%), उत्तर प्रदेश १४८३५ (१६.६%), दिल्ली ९३५० (१०.५%), महाराष्ट्र ८११४ (९.१%), पश्चिम बंगाल ४९०९ (५.५ %), असा आहे.

- या शीर्षकाखाली महाराष्ट्र राज्यात गुन्हयाचे प्रमाण (१६.७) एवढे असून, राज्याचा १४ वा क्रमांक आहे.

  ❖ **बालकांवरील_अत्याचाराचे गुन्हयांची आकडेवारी परिशिष्ठ - ४ मध्ये दर्शविली आहे मध्ये दर्शविली आहे.**

**-----------------000--------------------------000---------------------------**